पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/३७८/२०१०
दिनांक- २५/०३/२०१०

प्रति,
मा. ......................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ३०.३.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ३०.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १६२

दिनांक- ३०.३.२०१० वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ३०.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक २३.३.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६१) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१०/०९/१० मधील अ.क्र.७ अन्वये, भुगयो अंतर्गत पिंपळे सौंदागर पंप हाऊस येथिल पंपींग मशिनरीची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.फ्लोमॅक इंजि.कार्पोरेशन (नि.र.रू.१९,८४,८९१/- [र.रू. एकोणीस लाख चौऱ्याऐंशी हजार आठशे एक्यान्नव] पेक्षा ९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.३०.३.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य चौकातील वाहतुक सुधारणा करणेसाठी कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४४,०७,०९६/- [र.रू. चव्वेचाळीस लाख सात हजार शहान्नव] पेक्षा ३२.३३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२९,८२,२८२/- [र.रू.एकोणतीस लाख ब्याऐंशी हजार दोनशे ब्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.३०.३.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१३ अन्वये, पिंपरी वॉर्ड क्र.७२ येथे स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी मे.के.कमलेश (नि.र.रू. ४२,०१,५८१/- [र.रू.बेचाळीस लाख एक हजार पाचशे एक्याऐंशी] पेक्षा ४२.९४ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२३,९७,४२२/- [र.रू.तेवीस लाख सत्यान्नव हजार चारशे बावीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.३०.३.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक-४) नागरवस्ती विभागाकडील महिलांकरिता योजने अंतर्गत व मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत लाभार्थींना सायकलीचे वाटप करणेसाठी लेडीज व जेंन्टस सायकली खरेदीकामी ई-नि.क्र.१६/१-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.बोडके सायकल्स, काळेवाडी यांचे दर अ)लेडीज सायकली ५,६५६ नग प्रति नग र.रू.२,४२७/- प्रमाणे एकूण र.रू.१,३७,२७,११२/- व जेंन्टस सायकली १,८६० नग प्रति नग र.रू.२,५२६/- प्रमाणे एकूण र.रू.४६,९८,३६०/- याप्रमाणे दर स्विकृत करून करारनामा करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.३०.३.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ५) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १७/३/२०१० ठराव क्र.३२ नुसार, सन २००८-०९ या वर्षाची क्रीडा शिष्यवृत्ती एकुण १५२ पात्र विद्यार्थी खेळाडुंना र.रु.३,२०,४००/- ची क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १७/३/२०१० ठराव क्र.३३ नुसार, राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र, पुणे ६ यांना म.न.पा.चा इंद्रायणीनगर,भोसरी येथील बॅडमिंटन हॉल, गतवर्षीचे दरमहा मासिक भाडे र.रु.५,०५९/- मध्ये १०% भाडे वाढ करुन (र.रु.५०६/-) एकूण दरमहा भाडे र.रु.५,५६५/- आकारुन ११ महिने कराराने र.रु.२५,०००/- च्या एफ.डी.आर.चे नुतनीकरण

करुन करारनामा करुन, चालविणेस देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १७/३/२०१० ठराव क्र.३४ नुसार, म.न.पा.च्या वतीने महापौर चषक कॅरम,बुध्दिबळ स्पर्धा २०१० आयोजित करणेस यापुर्वी मान्यता दिलेली असली तरी परंतु काही कारणास्तव या स्पर्धा रद्द झाल्या असल्याने या स्पर्धा ऐवजी महापौर चषक जिल्हास्तर शुटिंग बॉल स्पर्धा २०१० या दि. २७ व २८ मार्च २०१० रोजी च-होली गांव येथे आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.१,७०,०००/-अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयातील स्टाफनर्सेस, स्त्री व पुरूष कक्ष मदतनीस यांचा नियुक्ती कालावधी दि. ११/३/२०१० रोजी संपला असल्याने रूग्णालयीन कामकाजात सुरूळीतपणे येणेकामी, विविध वॉर्डाचे व ऑपरेशन थिएटरचे कामकाज खोळंबू नये याकरिता नवीन नियुक्ती आदेश येईपर्यंत सध्या कार्यरत असणाऱ्या स्टाफनर्सेस, स्त्री कक्ष मदतनीस व पुरूष कक्ष मदतनीस यांना एक दिवसाचा सेवाखंड देवून एक महिनासाठीचे नियुक्तीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) भोसरी येथील नियोजित उड्डाणपुलाच्या मार्गात अडथळा ठरणारी दिघी रोड ते धावडेवस्ती या पुणे नाशिक महामार्गा वरील म.रा.वि.वि.कंपनीच्या उच्चदाब/लघुदाब वीजवाहीन्या हलविणे या कामाचे १.३ % पर्यवेक्षकीय शुल्क म.रा.वि.वि. कंपनी लिमीटेड यांस र.रू.१,०९,६००/- [र.रू.एक लाख नऊ हजार सहाशे] अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) भोसरी येथील नियोजित उड्डाणपुलाच्या मार्गात अडथळा ठरणारी पेट्रोल पंप ते आळंदी रोड या पुणे नाशिक महामार्गा वरील म.रा.वि.वि.कंपनीच्या उच्चदाब/लघुदाब वीजवाहीन्या हलविणे या कामाचे १.३ % पर्यवेक्षकीय शुल्क म.रा.वि.वि. कंपनी लिमीटेड यांस र.रू.१,१६,०००/- [र.रू.एक लाख सोळा हजार] अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) आनंदनगर ३ जुनी सांगली बँक मागे नव्याने वीज मीटर घेणेकामी येणारा खर्च र.रू.२,३५४/- [र.रू.दोन हजार तीनशे चोपन्न] म.रा.वि.वि.कं.लि.यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.१५ अन्वये, वॉर्ड क्र.३० नेहरूनगर येथे पाणीपुरवठा विषयक दुरुस्ती व सुधारणेची कामे करणेकामी मे.दिपक आपटे अन्ड असो. (नि.र.रू.९,२२,५४५/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा १८.६९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १३) जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियान अंतर्गत से.क्र. २२ येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत पाणीपुरवठा योजनेस उच्चदाब वीजपुरवठा घेणेकामी र.रू.६,२०,७०५/- [र.रू.सहा लाख वीस हजार सातशे पाच] म.रा.वि.वि.कंपनीस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) प्रस्तावात नमुद प्रमाणे प्रसिध्द झालेल्या जाहीरातीचे एकूण बिल र.रू.८,०९५/- [र.रू.आठ हजार पंच्यान्नव] दै.टाईम्स ऑफ इंडीया याना अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेच्या मालमत्तांचा विमा (दुर्घटना, जिवित हानीसह) उतरविण्यासाठी विविध विभागांकडून माहिती घेऊन विमा उतरविण्यास तसेच अग्निशामक विभाग व बहिणाबाई चौधरी सर्पउद्यान, विद्युत विभाग येथील कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा उतरविण्यास व त्या रक्कमेवरील वार्षिक प्रिमयम दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी कासारवाडी यांचेकडे जमा करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १६) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.४९ अन्वये, अ प्रभागात अतिक्रमण कारवाईकामी ट्रक, क्रेन जीप भाड्याने पुरविणेकामी मे.एम.जी.खाडे (नि.र.रू.४,९४,०५०/- [र.रू.चार लाख चौऱ्यान्नव हजार पन्नास] पेक्षा ४.५ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १७) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.६ अन्वये, भोसरी गावठाण टाकीवरून होणाऱ्या भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची व सुधारणेची कामे करणेकामी प्रियंका एन्टरप्रायजेस (नि.र.रू. ९,२२,५४५/-

[र.रू.नऊ लाख बावीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा ३०.१०% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १८) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, इंद्रायणीनगर टाकी मार्फत होणाऱ्या भागात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची व सुधारणेची कामे करणेकामी प्रियंका एन्टरप्रायजेस (नि.र.रू. ९,२२,५४५/- [र.रू.नऊ लाख बावीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा ३०.०५% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.६२ अन्वये, वॉर्ड क्र.२२ मधील ठिकठिकाणचे रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम.पध्दतीने दुरुस्त करणेकामी एन.एन. शिंगाडे (नि.र.रू.३,७५,०००/- [र.रू.तीन लाख पंच्याहत्तर हजार] पेक्षा ४१.८० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २०) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.८७ अन्वये, वॉर्ड क्र.३१ व ३२ मध्ये रस्त्याचे साईडपट्टी व ट्रेंचेसचे खडीकरण व डांबरीकरण करणेकामी मे.एन.एन.शिंगाडे (नि.र.रू.९,२२,२२१/- [र.रू.नऊ लाख बावीस लाख दोनशे एकवीस] पेक्षा ४१.५०% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २१) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५१ अन्वये, वॉर्ड क्र.५६ मधील नव्याने ताब्यात आलेले रस्ते खडीमुरुमाचे करणेकामी मे.शितल कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.९,१५,०३०/- [र.रू.नऊ लाख पंधरा हजार तीस] पेक्षा ३४.५० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २२) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.७ अन्वये, मासुळकर कॉलनी, मोरवाडी (वॉर्ड क्र. २९, ३५) मध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.प्रियंका एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२९,५६२/- [र.रू.नऊ लाख एकोणतीस हजार पाचशे बासष्ट] पेक्षा ३०.१०% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २३) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.६ अन्वये, खराळवाडी व गांधीनगर (वॉर्ड क्र.३३ व ३४) मध्ये पाणीपुरवठा विषयक देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.प्रियंका एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२९,५६२/- [र.रू.नऊ लाख एकोणतीस हजार पाचशे बासष्ट] पेक्षा २९.१०% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २४) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.७/०९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, से.क्र.२० त्रिवेणीनगर येथील उंच पाण्याच्या टाकीच्या आवारात स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.जय इंजिनिअर्स (नि.र.रू.२२,९६,१३७/- [र.रू.बावीस लाख शहान्नव हजार एकशे सदोतीस] पेक्षा २८.०७ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २५) वाय.सी.एम.रूग्णालयातील तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांची प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविलेप्रमाणे दरमहा एकत्रित मानधनावर दि.१/४/२०१० ते ३०/०९/२०१० सहा महिने कालावधीकरीता नियुक्ती करणेस तसेच प्रस्तावासोबतचे प्रपत्र ब प्रतिक्षायादीस १ वर्षे कालावधीकरीता मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २६) मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २७) मनपाच्या वतीने दि.२/१०/०९ व ८/१२/०९ रोजी झालेल्या विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने मान्यवरांसाठी भोजन व्यवस्था हॉटेल पंचशील येथे करण्यात आली होती. सदर भोजन व्यवस्थेसाठी र.रू.४०,४३६/- [र.रू.चाळीस हजार चारशे छत्तीस] खर्च झालेला असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २८) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे येथे Database concept and Designing चे संगणक विषयक प्रशिक्षण आयोजित केलेबाबत यशदा मार्फत कळविण्यात आलेले असून सदर प्रशिक्षण दि.८ मार्च २०१० ते दि.११ मार्च २०१० या कालावधीत यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आले असून प्रस्तुत प्रशिक्षणाकरीता प्रशासन विभागाकडील कॉ.ऑपरेटर श्री.किरवे अतुल आणि ना.सु.केंद्रातील कॉ.ऑपरेटर श्री.पालवे संजय यांची नेमणूक करण्यात आलेली असल्याने प्रस्तुत प्रशिक्षणाकरीता नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांकरीता प्रति, र.रू.३,०००/- याप्रमाणे एकूण २ कर्मचाऱ्यांकरीता येणाऱ्या र.रू.६,०००/- [र.रू.सहा हजार] चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील मे.रिचर्ड वूल्फ जर्मनी निर्मित (सन १९९९ मध्ये खरेदी केलेले) बेसिक लॅप्रोस्कोप सेट मधील बऱ्याचशा असेसरीज जादा वापरामुळे निकामी झालेल्या आहेत व सर्जरी विभागाचे कामकाज पुर्वीपेक्षा वाढलेले असल्याने तसेच सदर स्कोप अपग्रेडेशनसाठी लागणाऱ्या ॲसेसरीज (निकामी झालेले साहित्य परत करुन) हे साहित्य मे.रिचर्ड वूल्फ जर्मनी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्राईस लिस्टनुसार त्यांचे भारतातील अधिकृत विक्रेते M/s.DARAKE MEDICAL PRODUCTS, MUMBAI यांचेसमवेत करारनामा करुन आयात करण्यास व येणाऱ्या ११०१०९ युरो या खर्चास अधिक कस्टम ड्युटी, मुंबई-पुणे वाहतूक, कस्टम क्लिरींग चार्जेस, बँक चार्जेस, जकात इत्यादीचे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास तसेच परदेशी उत्पादित कंपनीच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत लेटर ऑफ क्रेडीट ओपन करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३०) वाय.सी.एम. रुग्णालयाकरिता आवश्यक लागणारे नॉन क्लोरोनोटेड प्लास्टिक बॅग ३०" x २७" (पिवळी) ५० नग प्रति पॅकेट १०० पॅकेट (५००० नग) व नॉन क्लोरोनोटेड प्लास्टिक बॅग ३०" x २७" (लाल) ५० पॅकेट प्रति पॅकेट ६० पॅकेट (३००० नग) असे एकूण ८००० नग प्लास्टिक नॉन क्लोरोनोटेड प्लास्टिक बॅग मे.पास्को इनवायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांचेकडुन प्राप्त झालेल्या दर पत्रकानुसार खरेदीकामी येणाऱ्या र.रु.१,४१,९२०/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक -३१) मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता उपलब्ध करुन दिलेल्या परदेशी बनावटीच्या ऑपरेशन टेबलकरीता आवश्यक लागणाऱ्या ॲसेसरीज ह्या Maquet GmbH & Company Germany या परदेशी उत्पादित कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रेते मे.एस.बी.डायनामेड प्रा.लि., यांचेकडून प्राप्त झालेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करण्यास व येणाऱ्या ४९४१० युरो अधिक कस्टम ड्युटी, विमा, वाहतूक, बँक चार्जेस, कस्टम क्लिरींग चार्जेस, जकात इत्यादीचे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास तसेच परदेशी उत्पादित कंपनीच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत लेटर ऑफ क्रेडीट ओपन करण्यास आणि भारतीय बनावटीचा एक आयटेम खरेदी करण्यास व त्यास येणाऱ्या र.रु.२,२३,४५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक -३२) महापौर चषक जिल्हास्तर कबड्डी स्पर्धा २०१० करिता कै.मधुकर पवळे क्रिडांगण से.नं.२१ यमुनानगर, निगडी येथे मंडप व्यवस्था करणेकामी मे.सिद्धी एन्टरप्रायजेस्,चिंचवड, पुणे -३३ यांचे सर्वात कमी दराचे कोटेशन असलेने सदर कामाची तातडी विचारात घेता मे.सिद्धी एन्टरप्रायजेस् यांचेकडुन सदर काम निविदा न मागविता व करारनामा न करता करुन घेण्याचे स्विकृतीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३३) दि.२८/३/२०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर जयंती कार्यक्रमासाठी थेट पद्धतीने येणाऱ्या मान्यवरांचे मानधन र.रु.९१,०००/- चे अपेक्षित खर्चास अथवा प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३४) सन २००९-१० चे सुधारीत व २०१०-११ चे अंदाजपत्रक सिद्धार्थ एजन्सी, पुणे यांचेकडून करारनामा न करता छपाई करुन घेणेस आलेल्या र.रु.२४,३८०/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३५) वायसीएम रुग्णालयातील इ.सी.यु. विभागाकरिता आवश्यक लागणारे १२ नग Area Alarm Control Pannel ची खरेदी निविदा नोटिस क्रमांक ०६/२००८-२००९ मधील लघुत्तम निविदाधारक मे.कृष्णा एन्टरप्रायजेस यांचेकडुन करारनामा करुन खरेदीकामी येणाऱ्या र.रु.२७,८४,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३६) दै.हिंदुस्तान टाईम्स या सर्व आवृत्तांचे जाहिरात आणि Corrigendum / प्रसिद्धचे एकत्रीत बिलांची निव्वळ देय र.रु.६,००,८००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७/०९/१० मधील अ.क्र.२ अन्वये, अ प्रभाग कार्यक्षेत्रातील पाण्याच्या टाक्या संप व पंपगृह इ. ठिकाणी व्हॉल्व्ह चालु बंद करणेसाठी मजूर पुरविणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू.१५,८३,६७६/- [र.रू. पंधरा लाख त्र्याऐंशी हजार सहाशे शहात्तर] पेक्षा ४६% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/३७८/२०१०
दिनांक : २५/०३/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.